।। कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।।

रजि.क्र. एफ४०२० स्थापना १९३७

# महाराष्ट्र सेवा संघ,

# मुलुंड









## वार्षिक अहवाल

## २०२४-२५

Email : mss_mulund@rediffmail.com
Web Site : www.mahasevasangh.org



गिरिमित्र संमेलन - प्रमुख पाहुणे ख्रिस्तोफ वेलिकी(पोलंड)







किल्ले प्रतिकृती बांधणी स्पर्धा



वसुंधरा संजीवनी - संस्थापक श्री. आनंदजी भागवत पुरस्कार स्वीकारताना



सा.स. न.चिं केळकर ग्रंथालय साहित्य साधना पुरस्कार



क्रीडा तपस्विनी सन्मान सोहळा



दृष्टिसेवा अभ्यासिका

।।श्री।।

अध्यक्षांचे मनोगत

गेले अनेक महिने जगभर युद्धमय आणि अशांततेचे वातावरण आहे. कोविड१९ आणि अन्यकारणांनी सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातही अस्थिरता आहे. दूरदर्शन वाहिन्या आणि समाजमाध्यमे यामुळे सभागृहात प्रत्यक्ष कार्यक्रमांना जाण्याची मानसिकता कमी झाली आहे. वृद्ध लोक बाहेर जाणे टाळतात आणि तरुणांना वेळ नाही त्यामुळे कार्यक्रमांनाही प्रेक्षक संख्या निराशाजनक असते. सामाजिक संस्थांना आर्थिक चिंताही भेडसावत आहेत.

अशाही परिस्थितीत म. से .संघाच्या मुलुंड आणि ऐरोली या दोन्ही ठिकाणच्या सर्व विभागांनी जिद्दीने आणि चिकाटीने कार्यक्रमांचे आयोजन केले. आर्थिक अडचणींमुळे कार्यक्रमांची संख्या कमी झाली. पण गुणवत्तेत कोठेही उणेपणा नव्हता. आर्थिक समस्येवर मात करण्यासाठी विश्वस्त आणि दोन्हीकडच्या कार्यकारी मंडळांनी खूप चिंतन केले, परिश्रम घेतले आणि खर्च कपात करून दुसरीकडे उत्पन्न वाढविण्याचे मार्ग शोधले. दोन्हीकडच्या कंत्राटदारांशी नव्याने करार करून ठोस पावले उचलली. ऐरोली शाखेतला सौरऊर्जेचा प्रकल्प विशेष उल्लेखनीय. तसेच दुसऱ्या मजल्यावरील व्यायामशाळेसंबंधी नवीन करार केले. यामुळे खर्चात बचत होऊन उत्पन्नाला स्थैर्य आले.

मुलुंड वास्तूच्या पुनर्विकासाविषयी बरेच चिंतन होऊन त्या दृष्टीने पावले उचलली गेली. १ मे २०२५ रोजी एक विशेष सर्वसाधारण सभाही या निमित्ताने झाली. गिरिमित्रसंमेलन नेहमीच्याच उत्साहात झाले. दृष्टिसेवा केंद्राने आपली यशस्वी परंपरा सलग १३व्या वर्षी चालूच ठेवली.

काहीशा प्रतिकूल परिस्थितीतही दोन्हीकडच्या सर्व कार्यकर्त्यांनी सकारात्मक भूमिका घेऊन हतोत्साह न होता सर्व विभाग सक्रिय ठेवण्यासाठी परिश्रम घेतले त्याविषयी सर्वांचे अभिनंदन आणि आभार.

रसिक नागरिकांनीही समाधानकारक प्रतिसाद दिल्यामुळे उपक्रमांचे सातत्य राहिले. वास्तूचा पुनर्विकास आणि कार्यक्रमांचे सातत्य सर्वांच्या सहकार्याने यशस्वीपणे होईल असा विश्वास आहे.

सर्वांना मनापासून शुभकामना.

*आपला,*
*चंद्रशेखर ना.वझे, अध्यक्ष*

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

**(स्थापना १९३७, नोंदणी : एफ् ४०२०)**


**विश्वस्त मंडळ**

श्री. चंद्रशेखर ना. वझे
श्री.अजित ग. करंदीकर
श्री. रमेश दे. धामणकर
डॉ. आनंद रा. कट्टी
श्री. उल्हास कृ. हंबर्डे
श्री. किरण रा. देशमुख

**कार्यकारी मंडळ**

**पदाधिकारी**

श्री.चंद्रशेखर ना.वझे (अध्यक्ष)
श्री.जयप्रकाश र. बर्वे - कार्यवाह
श्री. प्रकाश ह. सडेकर-कोषाध्यक्ष
श्री. सतीश श्री. पाटणकर (उपाध्यक्ष)
श्री. अवधूत पं. गोळे - सहकार्यवाह
श्री.धनंजय दि. दिवेकर- सहकोषाध्यक्ष

**सदस्य**

श्री.प्रदीप र. सप्रे
श्री. विजय वा. वझे
श्री. शंकर गो. वीरकर
श्री. महेंद्र तेरेदेसाई
श्रीमती नंदिनी हंबर्डे (स्वीकृत)
श्री.मनोहर कोशे (स्वीकृत )
श्री. विजय वैद्य (निमंत्रित)
श्री.विनायक ज. जोगळेकर
श्री.विनोद म. सौदागर (१९-११-२०२४पर्यंत)
श्री.गुरूप्रसाद कार्लेकर
श्री. किशोर पेंढरकर (स्वीकृत)
श्री. पंकज पाठक(स्वीकृत )
श्री. राहुल मेश्राम (स्वीकृत)
श्री. प्रसाद गोडसे(निमंत्रित)

**ऐरोली शाखा व्यवस्थापन समिती**

श्री. प्रदीप र. सप्रे - अध्यक्ष
श्री.मनोहर कोशे - कार्यवाह
श्री. शंकर गो. वीरकर
श्री. किशोर पेंढरकर -कोषाध्यक्ष
श्री. नवीन शामराव कुलकर्णी (सहकार्यवाह)
श्री.चंद्रशेखर ना. वझे (पदसिद्ध)
श्री. जयप्रकाश बर्वे (पदसिद्ध)

**मानद अंतर्गत हिशेब तपासनीस**

श्री. विवेक शहाणे (मुलुंडसाठी), श्रीमती प्राजक्ता लिमये (ऐरोलीसाठी)

**हिशेब तपासनीस**

मेसर्स सिंगवी, ओतुरकर, केळकर आणि कंपनी (सी. ए.)

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

**मुख्य कार्यालय व्यवस्थापन वर्ग**

श्री. संदीप परब : व्यवस्थापक
श्रीमती सुमिता पवार

**मुख्य कार्यालय सेवक वर्ग**

श्री. श्रीरंग भाष्टे
श्री. भास्कर इंगळे
श्री. जनार्दन वैती

**साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय - व्यवस्थापन वर्ग**

श्रीमती श्रद्धा गोविलकर - ग्रंथपाल
श्रीमती आरती रणदिवे
श्री. योगेश मोडक

**ऐरोली शाखा कार्यालय - व्यवस्थापन वर्ग**

श्रीमती प्रियांका शाळीग्राम (व्यवस्थापक)
श्रीमती केतकी शिंदे
श्रीमती वंदना जाधव

**ऐरोली शाखा कार्यालय - सेवक वर्ग**

श्री. प्रमोद चव्हाण
श्री. दीपक घाडगे.
श्री. नंदकुमार वाघमोडे
श्री. चव्हाण

**महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड**

म. से. संघ मार्ग व पं. जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग, मुलुंड (प.), मुंबई ४०० ०८०
दूरध्वनी : ८८७९४३२३२८
e-mail: mss_mulund@rediffmail.com
Web Site: www.mahasevasangh.org

**ऐरोली शाखा**

म. बा. देवधर संकुल, म. से. संघ मार्ग, सेक्टर १७,
ऐरोली, नवी मुंबई - ४००७०८
दूरध्वनी : ७०३९९२७०४२ / ९१३७४८८८५४
e-mail : mss.airoli@rediffmail.com

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

म. से. संघ मार्ग व पंडित जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग, मुलुंड (प.)

मुंबई - ४०० ०८०

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड संस्थेच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा (अहवाल वर्ष १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५) , रविवार, दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५.३० वा. संस्थेच्या मुलुंड येथील सु. ल. गद्रे सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. अध्यक्षांच्या प्रास्ताविकानंतर खालील कामांचा सभेत विचार होईल. या सभेला सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

### सभेपुढील कामे

१. दि. ०१.०५.२०२५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करणे व इतिवृत्तांत निर्देशित केलेल्या मुद्यांबाबतच्या कार्यवाहीची माहिती घेणे आणि इतिवृत्त कायम करणे.
२. कार्यकारी मंडळाने तयार केलेल्या २०२४-२५ सालच्या अहवालास मान्यता देणे.
३. संस्थेच्या वैधानिक हिशेब तपासनिसांनी तपासलेल्या व विश्वस्त आणि कार्यकारी मंडळाने संमत केलेल्या २०२४-२५ सालच्या उत्पन्न व खर्चाचे हिशेब आणि आर्थिक ताळेबंदास मान्यता देणे.
४. २०२५-२६ सालाकरिता अंदाजपत्रक संमत करणे.
५. २०२५-२६ सालाकरिता वैधानिक हिशेब तपासनिसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
६. २०२५-२६ सालाकरिता मानद अंतर्गत हिशेब तपासनिसांची नियुक्ती करणे.
७. घटना कलम ११(ब) नुसार सभासदांकडून आलेल्या सूचनांचा विचार करणे.
८. घटना कलम १९(१)नुसार अध्यक्षपदावरून निवृत्त निवृत्त होणाऱ्या १सदस्याची जागा भरणे
९. घटना कलम १३(२)नुसार विश्वस्त मंडळातून निवृत्त होणाऱ्या २ सदस्याची रिक्त जागा भरणे
१०. घटना कलम १८(९)नुसार कार्यकारी मंडळातून स्व.विनोद सौदागर यांच्या निधनामुळे झालेली १ व कार्यकारी मंडळातून निवृत्त होणाऱ्या ५ सदस्यांच्या अशा एकूण ६ जागा भरणे.
११. ऐरोली शाखेच्या कार्याची माहिती घेणे.
१२. दि.०१-०५-२०२५ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेने मुलुंड येथील वास्तूचा पुनर्विकास करण्यासाठी दिलेल्या मान्यतेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची माहिती देणे.
१३. अध्यक्षांच्या परवानगीने येणारी आयत्या वेळची कामे.

### विशेष सूचना

१. गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास तहकूब झालेली सभा ३० मिनिटांनंतर त्याच जागी भरेल व त्या सभेत आधी तहकूब झालेल्या सभेचे कामकाज राहील. या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२. सभासदांना सभांची इतिवृत्ते, हिशेबाच्या वह्या इ. पूर्वसूचनेने शनिवार, दि. २६ जुलै ते सोमवार, दि.०४ ऑगस्ट२०२५ पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ०७.३० या वेळेत कार्यालयांत पाहण्यास मिळतील.
३. कोणत्याही सभासदास काही माहिती हवी असल्यास अथवा काही सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी त्या सोमवार, दि.०३ ऑगस्ट २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळांत लेखी स्वरूपात द्याव्यात.
४. सभासदाने आपला पत्ता बदलला असल्यास संस्थेस कळवावा.
५. संस्थेच्या सभासदांची यादी संस्थेच्या कार्यालयांत सभासदांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळांत उपलब्ध होईल. ज्या सभासदाचे नाव यादीत चुकून आले नसेल त्याने ताबडतोब कार्यालयात लेखी कळवावे.
६. अध्यक्षपदावरून सर्वश्री चंद्रशेखर वझे ,विश्वस्त मंडळातून सर्वश्री रमेश धामणकर , उल्हास हंबर्डे निवृत्त होत आहेत. कार्यकारी मंडळातून सर्वश्री प्रकाश सडेकर, अवधूत गोळे, विनायक जोगळेकर, प्रदीप सप्रे, शंकर वीरकर निवृत्त होत आहेत व ते पुन्हा निवडणुकीस उभे राहण्यास पात्र आहेत.

**निवडणूक कार्यक्रम**

१. निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सर्वश्री प्रदीप नाटेकर, मोहित तांडेल व अरुण भंडारे यांची निवडणूक समिती नियुक्त करण्यात आली आहे. प्रदीप नाटेकर निवडणूक समितीचे प्रमुख असतील.

२. अध्यक्ष पदासाठी १ व विश्वस्त मंडळातील २ व कार्यकारी मंडळातील ६ जागांसाठी एकत्रित निवडणूक शनिवार, दि.१० ऑगस्ट २०२५ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळेत गुप्त मतदान पद्धतीने होईल. ३१.३.२०२४ पर्यंत सभासद झालेल्या व्यक्तींनाच या निवडणुकीत मतदान करता येईल.(सभासद क्र. आजीव ९९८ पर्यंत)

३. निवडणुकीची नामांकन पत्रे दि. २५ जुलै २०२५ ते ०२ ऑगस्ट २०२५ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळांत मिळतील.

४. निवडणुकीची नामांकन पत्रे स्वीकारण्याची वेळ दि.०२ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत आहे.
नामांकन पत्रांची छाननी दि. ०३ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ७.०० वाजता करण्यात येईल.

५. छाननीनंतर वैध उमेदवारांची यादी दि. ०४ ऑगस्ट २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. नामांकन पत्र मागे घेण्याची वेळ दि.०४ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ७.३० वाजेपर्यंत असेल.

६ निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवारांची अंतिम यादी दि.०५ ऑगस्ट २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

मुलुंड, दि. १९ जुलै २०२५ — जयप्रकाश बर्वे (कार्यवाह)

**टीप :**

- सभासदांना अहवालाची मुद्रित प्रत घरी न पाठवता, अहवालाची पीडीएफ कॉपी संस्थेच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्याचा निर्णय संस्थेच्या कार्यकारिणी ने घेतला आहे.
- या निर्णयानुसार सभासदांना अहवालाची पीडीएफ कॉपी संस्थेच्या mahasevasangh.org या संकेत स्थळावर दि.२४.०७.२०२५ पासून उपलब्ध होईल.
- ज्या सभासदांना अहवालाची मुद्रित प्रत हवी असेल, त्यांना ती दि.२५.०७.२०२५ पासून संस्थेच्या मुलुंड कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळेल.
- वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी देखील अहवालाच्या मुद्रित प्रती सभेला उपस्थित राहाणाऱ्या सभासदांना उपलब्ध करून देण्यात येतील.
- **सभेनंतर सभासदांच्या स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचा सभासदांनी अवश्य लाभ घ्यावा.**

**ऋणनिर्देश** : मुलुंड व ऐरोलीतील सर्व स्थानिक लोकप्रतिनिधी, पोलीसखाते, मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई महानगर पालिका, धर्मादाय आयुक्त, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र शासन, सिडको, वृत्तपत्रे , आकाशवाणी, दूरदर्शन, सर्व दूरचित्रवाहिन्या, सर्व वार्ताहर, आय.डी. बी.आय. बँक लि., बँक ऑफ बरोडा, ठाणे जनता सहकारी बँक लि; स्टेट बँक ऑफ इंडिया, सारस्वत बँक, ठाणे जनता सहकारी बँक, अपना बाजार, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ग.क. खांडेकर वाचनालय, पॉप्युलर प्रकाशन, ज्येष्ठ नागरिक संघ, मुलुंड पूर्व, रोटरी क्लब ऑफ मुलुंड, श्री. दीपक शहा, बॉम्बे मेडिकल एड फाऊंडेशन, दृष्टिसेवा केंद्रासाठी काम करणारे कर्मचारी, शिक्षकवर्ग, मदतनीस तसेच 'नॅब' यांचे तसेच गिरिमित्र संमेलनाचे तसेच इतर उपक्रमांचे सर्व देणगीदार, महाराष्ट्र सेवा संघाच्या सहकार्याने विविध उपक्रमांचे संयुक्त आयोजन करणाऱ्या सर्व संस्था व त्यांचे पदाधिकारी, संस्थेला विविध सेवा पुरविणारे सर्व कंत्राटदार, श्री. सतीश कामत , श्री. राजाराम नाटेकर, वैधानिक हिशेब तपासनीस मे. सिंघवी ओतूरकर व केळकर आणि कंपनी, मानद अंतर्गत हिशेब तपासनीस श्री. विवेक शहाणे व श्रीमती प्राजक्ता लिमये, 'महाराष्ट्र टाइम्स'चे श्री. पराग करंदीकर, श्री. विलास परुळेकर, श्री.समीर कर्वे, वैभव वझे, 'लोकसत्ता' चे श्री. विकास महाडिक, अभ्युदय बँक, कॉर्पोरेशन बँक, स्टेट बँक ऑफ त्रावणकोर, मुलुंड व ऐरोलीचे सर्व कार्यकर्ते आणि आमचे सर्व सभासद, हितचिंतक, व संस्थेचे सर्व काम आपुलकीने करणारा आमचा मुलुंड व ऐरोली येथील कार्यालय व ग्रंथालय व्यवस्थापन , सेवक वर्ग या सर्वांनी दिलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल आम्ही ऋणी आहोत.

जयप्रकाश र. बर्वे, कार्यवाह — चंद्रशेखर ना. वझे ,अध्यक्ष

**पदाधिकारी सभा - उपस्थिती तपशील**

| अनु.क्र. | पदाधिकाऱ्याचे नाव | विश्वस्त | विश्वस्त व कार्यकारी मंडळ | कार्यकारी मंडळ |
|---|---|---|---|---|
| | **एकूण सभा ➔** | २ | **१०** | **४** |
| १ | श्री. चं.ना.वझे (अध्यक्ष) | १ | ९ | ३ |
| २ | डॉ. श्री.आ.रा. कट्टी | २ | ४ | - |
| ३ | श्री.र.दे. धामणकर | १ | ७ | - |
| ४ | श्री.अ.ग. करंदीकर | २ | ३ | - |
| ५ | श्री. उ.कृ.हंबर्डे | २ | ३ | - |
| ६ | श्री. कि.रा. देशमुख | २ | १० | - |
| ७ | श्री.ज.र.बर्वे (कार्यवाह) | १ | २ | ३ |
| ८ | श्री.ध.दि.दिवेकर | - | ० | ३ |
| ९ | श्री.वि.म. सौदागर | - | ४ | ८ |
| १० | श्री. प्र.र. सप्रे | - | ६ | २ |
| ११ | श्री.वि.ज.जोगळेकर | - | १ | २ |
| १२ | श्री.वि.वा.वझे | - | ५ | ३ |
| १३ | श्री.स.श्री.पाटणकर (उपाध्यक्ष) | २ | ९ | ३ |
| १४ | श्री. अ.पं. गोळे | - | ६ | ३ |
| १५ | श्री.प्र.ह.सडेकर (कोषाध्यक्ष) | - | ९ | ४ |
| १६ | श्री.शं.गो.वीरकर | - | ६ | ३ |
| १७ | श्रीमती नंदिनी हंबर्डे | - | ७ | २ |
| १८ | श्री.किशोर म. पेंढरकर | - | ५ | ३ |
| १९ | महेंद्र तेरेदेसाई | - | ६ | ४ |
| २० | गुरुप्रसाद कार्लेकर | - | ८ | ४ |
| २१ | पंकज पाठक | - | ० | ० |
| २२ | राहुल मेश्राम | - | ८ | ४ |
| २३ | विजय वैद्य | - | १० | ४ |
| २४ | मनोहर कोशे | - | ६ | ३ |
| २५ | प्रसाद गोडसे | - | १ | ० |

**सभासदांना मिळणाऱ्या सवलती**

संस्थेच्या सभासदांस, सभासदत्वास एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर केवळ त्यांच्या स्वतःच्या किंवा त्यांच्या मुलांच्या वा मुलींच्या लग्न, मौंजीबंधन, या कार्यांसाठीच सु.ल.गद्रे सभागृहाच्या भाड्यात रु.३,०००/- व सभागृह क्र.२च्या भाड्यात रु. २,०००/-ची सूट मिळते. एका सत्रासाठी नोंदणी केल्यास अनुक्रमे रु.१,५००/- व रु.१,०००/-ची सूट मिळते. तसेच ऐरोली येथे सभागृहाच्या भाड्यात रु.१,०००/- ची सूट मिळते.

**सभासद संख्या**

| सभासद श्रेणी | मार्च२४अखेर सभासद संख्या | अहवालसाली झालेले सभासद | दिवंगत झालेले सभासद | मार्च २५ अखेरीस सभासद संख्या |
|---|---|---|---|---|
| सन्माननीय | ८ | | | ८ |
| आधारस्तंभ | ७ | | | ९ |
| आश्रयदाते | ५ | | | ५ |
| पत्ता माहीत नसलेले | | | | |
| आजीव | ९९८ | २ | ४ | ९९६ |
| **एकूण** | **१०१८** | **२** | ४ | **१०१६** |

**एकूण हरित सभासद** - ३५०

सभागृह नोंदणीचा तपशील - अहवालवर्षी आपल्या संस्थेच्या सभागृहांत झालेले कार्यक्रम -

**मुलुंड वास्तू**

| कार्यक्रम | सभागृह क्र.१व२ | सभागृह क्र.१व२ | सभागृह क्र.४ |
|---|---|---|---|
| लग्न,मुंज इ. प्रदर्शने, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम | ११ पू | १३ स<br>२० सायं.<br>३१ संस्था कार्यक्रम | ३पू<br>२ स<br>४ सायं.<br>१७ संस्था |

**ऐरोली वास्तू -**

| कार्यक्रम | सभागृह क्र.१ वातानुकूलित | सभागृह क्र.१ बिगर वातानुकूलित | तळमजला |
|---|---|---|---|
| लग्न,मुंज इ. प्रदर्शने, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम | ७पू ,<br>५स | १पू<br>७स | २० |

पू -पूर्ण वेळ, स-सत्रवार,

**श्रद्धांजली**

अहवाल वर्षी म.से.संघाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक भा. ल. महाबळ (आजीव६२) , महाराष्ट्र सेवा संघाचे सक्रिय कार्यकर्ते, उपाध्यक्ष व अध्यक्ष, ग्रंथालय समिती सदस्य, दृष्टिसेवा विभागाचे अध्यक्ष अशी अनेक जबाबदारीची पदे भूषविलेले विनोद सौदागर(आजीव ७६०), केळकर ग्रंथालयाच्या माजी सदस्या इंदिरा कुलकर्णी, म.से.संघाचे माजी विश्वस्त मुकुंद भुसारी (आजीव ४८१), ग्रंथालयाचा लोकप्रिय उपक्रम 'वाचक संवाद' सुरू करणारे बळवंत अळवणी, बल्लाळ चिंतामण तथा दादा जोशी(आजीव०७१), मधुसूदन बर्वे (आजीव१८८), सन्माननीय सदस्य शंकरराव गोखले यांचे निधन झाले.

**या सर्व सदस्यांना संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली!**

अहवाल वर्षी डॉ. वि. ना. श्रीखंडे (उत्कृष्ट शल्य विशारद) व लेखक, वीणाताई देव, टाटा उद्योग समूहाचे सर्वेसर्वा अणि महान उद्योगपती रतन टाटा, विनोदी अभिनेते अतुल परचुरे, ज्येष्ठ अभिनेते विजय कदम, व्यासंगी पत्रकार नीला उपाध्ये, ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ व गणितज्ञ डॉ. जयंत नारळीकर, तबला वादनाचे जादूगार झाकीर हुसैन, सिने दिग्दर्शक श्याम बेनेगल, ज्येष्ठ साहित्यिक रावसाहेब बोराडे, ज्येष्ठ लेखिका डॉ.मीना प्रभू, भारताचे माजी प्रधानमंत्री डॉ.मनमोहन सिंह, ज्येष्ठ न्यायमूर्ती व ९६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष नरेंद्र चपळगांवकर, लोकप्रिय क्रिकेट समीक्षक, स्तंभलेखक, लेखक, सूत्रसंचालक द्वारकानाथ संझगिरी यांचे निधन झाले

**या सर्व दिग्गजांना संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली!**

## महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड व ऐरोली शाखांच्या उपक्रमांसाठी तसेच स्थिर निधीसाठी मिळालेल्या देणग्या

| अनु. क्र. | तपशील | रुपये |
|---|---|---|
| १ | सविता गद्रे (सु.ल. गद्रे पुरस्कारासाठी) | १,००,००० |
| **संस्थेच्या विविध उपक्रमांसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | जयप्रकाश बर्वे | २५,००० |
| २ | संजय रानडे | २५,००० |
| ३ | प्रकाश सडेकर | १५,००० |
| ४ | नंदिनी हंबर्डे | १५,००० |
| ५ | उल्हास हंबर्डे | १५,००० |
| ६ | अरुण भंडारे | १५,००० |
| ७ | महेंद्र तेरेदेसाई | १५,००० |
| ८ | इतर | ५,६७,९२३ |
| | **एकूण** | ६९२,९२३ |
| **सुगी महोत्सवासाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | सायली राजाध्यक्ष | ५०,००० |
| २ | नरेंद्र पवार | १५,००० |
| ३ | डी.के. कंस्ट्रक्शन | २५,००० |
| ४ | मल्लेश कोम्मू | २५,००० |
| ५ | प्राजक्ता पाटील | १०,००० |
| ६ | किसान कनेक्ट | १,२०,००० |
| ७ | सुमुख डेव्हलपर्स | ५०,००० |
| ८ | इतर | १,७३,००० |
| | एकूण | ४,६८,००० |
| **‘वाल्मिकी रामायण’ साठी मिळालेल्या देणग्या** | | ४३,००० |
| **‘वर्दी ते लेखणी’ साठी मिळालेल्या देणग्या - अरुण भंडारे** | | १०,००० |
| ग्रंथालय व उपक्रमांसाठी मिळालेल्या देणग्या | | |
| १ | सुमुख डेव्हलपर्स | ५०,००० |
| २ | इतर देणग्या | १०,००० |
| | एकूण | ६०,००० |
| | समीर कर्वे - लेखन स्पर्धा | १०,००० |
| साहित्य साधना पुरस्कार | | |
| १ | सु.ना.पाटणकर | २५,००० |
| **संस्कृत विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | चंद्रशेखर वझे | १०,००१ |
| २ | इतर देणग्या | २०,००० |
| | **एकूण** | ३०,००० |
| **ऐरोली शाखेला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्री संत अच्युत महाराज सत्संग मंडळ | ७०,००० |
| २ | आशिष राणे | ६६,००० |

| | | |
|---|---|---|
| ३ | इतर | ५,००० |
| | **एकूण** | १,४१,००० |
| **दृष्टिसेवा अभ्यासिकेसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | राधा राव | ३०,००० |
| २ | वासंती वैद्य | २३,००० |
| ३ | ममता शानभाग | २१,००० |
| ४ | लीला गोखले | २०,००० |
| ५ | प्रतिभा दळवी | २०,००० |
| ६ | प्रभाकर कराडकर | २०,००० |
| ७ | गायत्री राऊत | १५,००० |
| ८ | अंजली जोशी | १०,००१ |
| ९ | अभिजित बर्वे | १०,००१ |
| १० | परशुराम नांदगावकर | १०,००० |
| ११ | अश्विनी पोखरे | १०,००० |
| १२ | मधुरा महंत | १०,००० |
| १३ | इतर देणग्या | ५५,९०२ |
| | **एकूण** | २,४५,९०३ |
| **अर्थ विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | इतर देणग्या | २,५०० |
| **मैत्रेयी विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | डॉ. सिंधू डांगे | ३०,००० |
| २ | रघुनाथ आव्हाड | २५,००० |
| ३ | जे.के. फायबर ग्लास प्रा. लि. | ५,००० |
| ४ | इतर देणग्या | ५,००० |
| | **एकूण** | ७५,००० |
| **गिरिमित्र संमेलन** | | |
| १ | रेमण्ड लि. | १,००,००० |
| २ | रवींद्र पाटील | १,००,००० |
| ३ | सतीश गायकवाड | ५०,००० |
| ४ | प्रॉडक्ट प्रमोशन्स | ५०,००० |
| ५ | कोकुयो कॅम्लिन प्रा.लि. | ५०,००० |
| ६ | लेझर शेविंग प्रॉडक्ट्स | १५,००० |
| ७ | विजया ओवळेकर | १०,००० |
| ८ | सिम्रत - सतीश गायकवाड | १०,००० |
| ९ | आत्माराम परब | १०,००० |
| १० | उर्मि पोपट | १०,००० |

| | | |
|---|---|---|
| ११ | इतर देणग्या | ५,०७,३८७ |
| | एकूण | ९,१२,३८७ |

**संस्थेने दिलेल्या देणग्या**

| अनु. क्र. | देणगी दिलेली संस्था | देणगी रक्कम- रुपये |
|---|---|---|
| १ | आचार्य अत्रे समिती | १,०३,,००० |
| २ | नवबर्ष स्वागत यात्रा समिती | १,०३,००० |
| | **एकूण** | २.०६,००० |

## महाराष्ट्र सेवा संघाचे प्रमुख कार्यक्रम

| अ.क्र | तारीख | कार्यक्रम | सहभागी संस्था/ कलाकार/तज्ज्ञ |
|---|---|---|---|
| १ | ०९ जून २०२४ | महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड आणि अंतर्नाद प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने सांस्कृतिक कार्यक्रम | पं श्री अरुण द्रविड , श्री श्रीकांत बोजेवार (म.टा.) |
| २ | १२ जून २०२४ | महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड आणि महाराष्ट्र टाइम्स यांच्या संयुक्त विद्यमाने वर्दी ते लेखणी | पोलिसांसाठी पुस्तक परीक्षण स्पर्धा |
| ३ | २३ जून २०२४ | महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड आणि स्वा सावरकर साहित्य अभ्यास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सुविधा शंकर गोखले यांच्या स्मृती प्रित्यर्थ "शास्त्रीय व उप शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम" | कलाकार -मृणाल नाटेकर भिडे– गायन, सारंग कुलकर्णी - संवादिनी<br>रोहित प्रभुदेसाई -तबला साथ |
| ४ | जुलै २०२४ ते डिसेंबर २०२४ | महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड आयोजित<br>चिल्ड्रेन्स थिएटर अकादमी संचालित<br>राजू तुलालवार यांची बालनाट्य शाळा | |
| ५ | २ऑक्टोबर २०२४ | तपस्विनी … निष्ठा अनुभव मार्गदर्शन…<br>मुलुंडचा ओलिंपिक प्रवास | भारतीय ऑलिम्पिक चमूच्या मुलुंडवासी मार्गदर्शिका - मिहिरा खोपकर,क्रीडा पोषण तज्ज्ञ आणि दिपाली देशपांडे , राष्ट्रीय नेमबाजी संघ प्रशिक्षक, मुलाखत कार -डॉ नितीन पाटणकर , आहार आणि स्वास्थ्य विशेषज्ञ , श्री पराग फाटक , क्रीडा पत्रकार, प्रमुख उपस्थिती - डॉ विकास महात्मे, अध्यक्ष AIMMS नागपूर, माजी राज्यसभा खासदार , पद्मश्री पुरस्कृत नेत्र तज्ज्ञ |
| ६ | ३१ ऑक्टोबर २०२४ | महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड आणि GSB सभा मुलुंड यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी पहाट २०२४ | गायक- अवधूत रेगे , अभिषेक मरोळकर<br>गायिका -अनघा पेंडसे मानसी फडके<br>तबला -मनीष धुमारे, रवी नवले<br>कि बोर्ड - ओंकार देवस्कर<br>सूर- अभिजित पाटील<br>निवेदिका - साधना जोशी |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | १६ नोव्हेंबर २०२४ | सांगीतिक गप्पा–गोष्टी ,आठवणी किस्से गमती जमती आणि संगीताचा बहारदार कार्यक्रम | सादरकर्ते पं प्रदीप नाटेकर –ज्येष्ठ संगीतज्ञ आणि संगीत गुरु<br>सुसंवादक - सतीश पाटणकर |
| ८ | १८ डिसेंबर २०२४ | स्मरण सभा | माजी विश्वस्त साहित्यिक भा ल महाबळ आणि संस्थेचे कायकर्ते श्री विनोद सौदागर यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी स्मरण सभा |
| ९ | ११ जानेवारी २०२५ व १२ जानेवारी २०२५ | महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड आणि मुंबई स्वयंपाकघर यांच्या संयुक्त विद्यमाने सुगी महोत्सव | हुरडा पार्टी, धान्य बाजार, प्रात्याक्षिके, मुलाखती |
| १० | २५ जानेवारी २०२५ | सु ल गद्रे सामाजिक संस्था पुरस्कार | वसुंधरा संजीवनी मंडळ, ठाणे संस्थेचे संस्थापक श्री आनंदजी भागवत, प्रमुख पाहुणे– डॉ अभिजित फडणीस, मुलाखतकार मकरंद जोशी ,<br>सूत्र संचालन- मकरंद मुळे |
| ११ | १ मार्च २०२५ व दि २ मार्च २०२५ | आर्टिस्ट्री आयोजित – देणे समाजाचे | अनेकविध क्षेत्रात काम करणाऱ्या समाजसेवी संस्थांचे काम माहित करून घेऊन त्यांना पाठबळ देण्याची संधी देणारा हा उपक्रम – वीणा गोखले |
| १२ | २२ फेब्रुवारी २०२५ | महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड आणि स्वा सावरकर साहित्य अभ्यास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वा. सावरकरांच्या आत्मार्पण दिनानिमित्त | सामाजिक समरसता- योगिता साळवी ,<br>स्वातंत्र्यवीरांवरील आक्षेप आणि तथ्य<br>ॲड. वृंदा देशपांडे |

## संस्कृत विभाग

अध्यक्ष - प्रसाद गोडसे, कार्यवाह - सुमेधा नवाथे
सभासद - भाव्ना दांडेकर, गुरुप्रसाद कार्लेकर,चंद्रशेखर वझे, जयप्रकाश बर्वे

संस्कृत विभागातर्फे २०२४- २५ या आर्थिक वर्षात खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.
गुरुवार, दि.२५.०७.२०२४ गुरुवार दि. ०१.०८.२०२४ रोजी गुरुपौर्णिमे निमित्त श्री.चंद्रशेखर वझे यांनी गुरु आणि शिष्य (आजच्या संदर्भात) भारतीच परंपरेतील मौलिक चिंतन या विषयावर मार्गदर्शन केले.
संस्कृत रसास्वाद वर्ग - दि.१७.०८.१९८५ पासून सुरु केलेला हा उपक्रम या वर्षीही जोमाने सुरु राहिला.
गुरुवार, दि. २७.०६.२०२४ रोजी ‘ वैष्णव आगम ’ या विष्यावर डॉ.स्वाती द्रविड यांनी मार्गदर्शन केले.
आरती हा साहित्य प्रकार आहे. तेव्हा आरती म्हणजे काय ?. ती कशी म्हणावी ? कशी करावी ? शब्दांचा अर्थ काय ? घालींन लोटांगण, मंत्रपुष्प यामागे आशय आहे, हे समजून घेणारा श्री गणेश चतुर्थी निमित्त गुरुवार दि. ०५ सप्टेंबर २०२४ रोजी आरत्या व देवे (मंत्र पुष्प) हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला
गुरुवार, दि.१२.१२.२०२४ रोजी गीता जयंतीच्या निमित्ताने पं.प्रभाकर भातखंडे यांनी इशावास्योपनिषद व उपनिषद आणि गीता या विषयावर उद्बोधन केले.

गुरुवार, दि.०२.०१.२०२५ पासून श्रीमद्भगवदगीता जाणून घेण्यासाठी वर्ग सुद्धा सुरू झाला. यात श्री.चंद्रशेखर वझे मार्गदर्शन करत आहेत. तसेच 'विष्णूसहस्त्रनाम' या विषयावरील विवेचन वर्ग सुद्धा सुरु आहे.
बुधवार दि. १५.०१.२०२५ रोजी ६३ व्या महाराष्ट्र राज्य संस्कृत नाट्य स्पर्धेत 'योगायोग' हे नाटक बिबवेवाडी, पुणे येथे सादर करण्यात आले. या नाटकाचे लेखन श्री.चंद्रशेखर वझे यांनी केले होते आणि दिग्दर्शन श्री. आनंद केळकर यांनी केले होते.
गुरुवार, दि.०६.०२.२०२५ रोजी संस्कृत रसास्वाद वर्गामध्ये विशेष मेजवानी म्हणून 'हास्यमेव जयते । काही रंजक सुभाषिते' या विषयावर वक्त्या डॉ.मृणालिनी नेवाळकर - गोसावी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.
सोमवार, दि.३१.०३.२०२५ रोजी, श्री राम नवमी निमित्त श्रीरामरक्षा स्तोत्र वर्ग आयोजित करण्यात आला. या वर्गात उच्चार शुद्ध कसे करावेत, प्रत्येक शब्दाचा अर्थ काय ? पुराणातल्या कथा आध्यत्मिक आशय काय आहे ? हे रंजकपणे समजावून घेण्यासाठी एक विशेष सत्र आयोजित करण्यात आले होते. वक्ते होते चंद्रशेखर वझे. सुमारे ७० ते ८० जाणांनी यात सहभाग घेतला.

सुमेधा नवाथे , कार्यवाह | प्रसाद गोडसे ,अध्यक्ष

## आरोग्य विभाग

र. दे. धामणकर - अध्यक्ष, विनायक जोगळेकर - कार्यवाह
सदस्य : अ. मो. भंडारे, प्रकाश सडेकर, डॉ.नितीन पाटणकर

आरोग्य विभागा तर्फे २०२४– २५ या आर्थिक वर्षात पुढीलप्रमाणे कार्यक्रम करण्यात आले.
शनिवार, दि. २१ जून २०२४ रोजी, "महाराष्ट्र सेवा संघ मुलुंड" आणि "योग साधना" व "फाल्गुनी योग वर्ग" यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिनानिमित्त "विशेष योग सभा" कार्यक्रम करण्यात आला. या कार्यक्रमात दीर्घायुष्य आणि उत्तम आरोग्यासाठी योग आणि आहार यांचे प्रात्यक्षिक आणि मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमात ५० साधकांनी भाग घेतला.
रविवार, दि. ०९ मार्च २०२५, रोजी चिकित्सक डॉ. गौरी पाठक ओक यांच्या मार्गदर्शनाखाली "विनामूल्य संधिवात तपासणी शिबिर " घेण्यात आले. या शिबिरात चिकित्सेबरोबर पोश्चर स्कॅन आणि शरीर संतुलन तपासणी, फिजिओथेरपिस्ट सल्ला (डॉ. जुईली पालकर, डॉ. ऐश्वर्या कदम), बी. एम. डी. तपासणी (बोन मिनरल डेन्सिटी), ग्लुकोमीटरवर रक्तशर्करा तपासणी, न्युरोपॅथिक स्क्रीनिंग तपासण्या विनामूल्य करण्यात आल्या. सुमारे ११० स्त्री पुरुष सभासदांनी याचा लाभ घेतला.

महाराष्ट्र सेवा संघ मुलुंड आणि बॉम्बे हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने मॉडेल टाऊन येथे चालविण्यात येणाऱ्या दवाखान्यात, चाल विण्यात येणारे फिजिओथेरपी केंद्र दिवसेंदिवस अधिकाधिक लोकप्रिय होत असल्याचे दिसते. यावर्षी ५१४९ म्हणजे दरमहा सरासरी ४२९ रुग्णांनी या सेवेचा लाभ घेतला. इतर आजारांवरील औषधोपचारासाठी वर्षभरात दवाखान्याचा लाभ घेणाऱ्या रुग्णांची संख्या ११५४ आहे. आसपासच्या परिसरातील लोकवस्ती डोळ्यासमोर ठेऊन येथील उपचार अत्यंत माफक व वाजवी दरात करण्यात येतात.

विनायक जोगळेकर , कार्यवाह | र.दे धामणकर, अध्यक्ष

# मैत्रेयी- महिला विभाग

वीणा नाटेकर (अध्यक्ष), मेधा देव (कार्यवाह)
सदस्य : माधवी भुसारी, वासंती वैद्य, नंदिनी हंबर्डे, मीना वीरकर, अनुपमा देशपांडे, मृदुला सौदागर, शमी सडेकर

मैत्रयी महिला विभाग - २०२४ -२५

३० एप्रिल २०२४ : वासंतिक मेळाव्या निमित्त 'वसंतोत्सव' हा कार्यक्रम सादर झाला. सादरकर्त्या होत्या श्रीमती दिपाली केळकर.
२ जून २०२४ : अक्षरमैत्री ३५४ वा कार्यक्रम आयोजित केला गेला. ह्या कार्यक्रमात सर्व श्रोत्यांनी/वाचकांनी आपापल्या पुस्तकांतील लेखाचे अभिवाचन सादर केले.
९जुलै २०२४ : अक्षरमैत्रीचा ३५५ वा कार्यक्रम आयोजित केला होता. 'आपण जे वाचतो ते कुणाला तरी सांगावेसे वाटते 'ह्या संकल्पनेतून श्रोत्यांसाठी अभिवाचन होते, ज्यात अनेक श्रोत्यांनी / वाचकांनी अभिवाचन सादर केले.
३ सप्टेंबर २०२४ : अक्षरमैत्रीचा ३५६ वा कार्यक्रम आयोजित केला होता. या अंतर्गत कविता सादरीकरणाचाकार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ज्यात अनेक श्रोत्यांनी उत्फूर्तपणे कविता सादर केल्या.
४ ऑक्टोबर २०२४ : मुलुंडमधील सर्व महिला मंडळे मिळून 'शारदोत्सव' साजरा केला. या अंतर्गत मुक्ताबाई ते बहिणाबाई अशा पाच संत कवयित्रींच्या जीवनावर प्रकाश टाकणारा 'तिनेच गगन झेलियले' हा कार्यक्रम डॉ.अपर्णा बेडेकर ह्यांनी सादर केला.
१९ ऑक्टोबर २०२४ : 'मला काय वाटतं' या लेखन स्पर्धेचा बक्षीस समारंभ. ही लेखन स्पर्धा सप्टेंबर महिन्यात 'ऑनलाईन' घेण्यात आली व  सा.स. न.चिं. केळकर ग्रंथालय व महिला विभाग मैत्रेयी  ह्यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. ह्या लेखन स्पर्धेसाठी श्रीमती अस्मिता मोहिते आणि श्रीमती माधुरी ताम्हणे ह्यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.
८ फेब्रुवारी २०२५ : मैत्रेयीचे ३५ वे स्नेहसंमेलन साजरे झाले. पहिल्या सत्रात डॉ.सिंधुताई डांगे पुरस्कृत कै.सौ. प्रभावती पागे पुरस्कार श्रीमती आरती चौहान ह्यांना त्यांच्या 'गच्चीवरील शेती' ह्या उपक्रमासाठी प्रदान करण्यात आला. प्रदानकर्त्या होत्या डॉ.नीलिमा कुलकर्णी, माजी अध्यक्ष, हरियाली मुंबई -मुलुंड. दुसऱ्या सत्रात ज्येष्ठ कविवर्य भा.रा. तांबे ह्यांच्या कविता व गीतांवर आधारित 'मधुघट' हा कार्यक्रम सादर झाला. ह्यासाठी देणगी प्रवेशिका ठेवण्यात आली होती. अल्पोपाहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

मैत्रेयी व सा.स.न.चिं.केळकर ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'मला काय वाटतं' या लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचा तपशील ग्रंथालयाच्या अहवालात दिला आहे.

याही वर्षी मैत्रेयी नेहमीप्रमाणेच दर्जेदार कार्यक्रम देण्याचा प्रयत्न करणार आहे. धन्यवाद!

मेधा देव ,कार्यवाह                    वीणा नाटेकर,अध्यक्ष

# कला विभाग



अध्यक्ष - महेंद्र तेरेदेसाई , कार्यवाह : वैदेही फडणीस
सदस्य - मुग्धा गोळे, मोहित वैद्य, कविता नाईक

महाराष्ट्र सेवा संघाच्या सध्याच्या कार्यक्रम कपातीच्या धोरणामुळे यंदा कला विभागातर्फे खूपच कमी कार्यक्रम आयोजित करता आले. सिनेमा ऑन बेंच हा उपक्रम जो स्वेच्छामूल्यावर चालू होता तो नाममात्र सदस्य वर्गणीवर राबवला गेला.
त्या उपक्रमा अंतर्गत -
अनॅटमी ऑफ फॉल, इकिरु, सॉरी व्ही मिस यू, मिर्च मसाला, लिंकन, चारूलता, द फादर, पाथेर पांचाली असे दर्जेदार चित्रपट दाखवले गेले. त्याला वेळोवेळी खूप चांगला प्रतिसाद मिळत होता. खासकरुन सिनेमा नंतर होणाऱ्या चर्चा खूपच उद्बोधक आणि चित्रपटांचे रसग्रहण करणाऱ्या होत्या.

या वर्षी नाटकाचे प्रयोग फारसे झाले नाहीत. चं. प्र. देशपांडे लिखित आणि अभिजीत झुंजारराव दिग्दर्शित व रमेश वाणी अभिनीत ' मन' या दीर्घांकाला खूप चांगला प्रतिसाद मिळाला.

१५ मार्च रोजी दोन एकांकिका सादर झाल्या. पहिली महेंद्र डोंगरे लिखित दिग्दर्शित 'अंधारदरी' आणि दुसरी दिलीप जगताप लिखित आणि राजीव वेंगुर्लेकर दिग्दर्शित 'वाहनतळ' दोन्ही एकांकिका प्रायोगिक होत्या. त्यांना प्रेक्षकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला. सदर प्रयोगाला डॉ. अनिल बांदिवडेकर आणि विलास पगार यांच्यासारखे नामांकित रंगकर्मी आणि रेखा देशपांडे यांच्यासारख्या अभ्यासू समीक्षक आणि ख्यातनाम लेखिका उपस्थित होत्या. या मान्यवरांनी त्या प्रयोगांचं कौतुक केलं.

महाराष्ट्र सेवा संघ हे आता प्रायोगिक रंगभूमीसाठी आणि काही नवीन करू पाहणाऱ्या नव्या व जुन्या रंगकर्मीसाठी मुंबईतलं एक हक्काचं व्यासपीठ सिद्ध होत आहे याचा उल्लेख करत त्यांनी महाराष्ट्र सेवा संघाचे आभार मानले आणि अभिनंदनही केले.

आपण लवकरच पूर्वस्थितीत येऊन कला विभागाद्वारे चांगले कार्यक्रम आपल्या रसिक प्रेक्षकांसाठी आयोजित करु अशी आशा आहे.
धन्यवाद!

कार्यवाह : वैदेही फडणीस | महेंद्र तेरेदेसाई , अध्यक्ष

# गिरिमित्र विभाग



अध्यक्ष : हृषीकेश यादव,  , कार्यवाह : किरण देशमुख
सभासद : ॲड. रवी परांजपे, राहुल मेश्राम, प्रसाद जोशी, रमेश कुलकर्णी व श्रीमती अपर्णा भट्टे, माधव फडके

वर्ष २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी गिरिमित्र विभागाचा वार्षिक अहवाल सादर करताना विभागाच्या कार्यकारी समितीस आनंद होत आहे.

**गिरिमित्र संमेलन :**

साधारण जानेवारी २०२४ पासूनच २१ व्या संमेलनाच्या तयारीसाठी बैठका सुरु झाल्या . सांगोपांगी चर्चा होऊन ह्या वर्षासाठी विशेष अशी कोणतीही मध्यवर्ती संकल्पना न ठरवता सर्वच कार्यक्रम योग्य विविधता राखत, मात्र गिर्यारोहणाशी संबंधित असे ठरवण्यात आले . दि. १३ व १४ जुलै २०२४ रोजी पार पडलेल्या या संमेलनासाठी अध्यक्ष तसेच मुख्य अतिथी म्हणून जगप्रिसध्द पोलंड स्थित गिर्यारोहक श्री ख्रिस्तोफ वेलीकी आणि विशेष अतिथी म्हणून इतिहासतज्ज्ञ श्री. प्रवीण भोसले हे लाभले. संमेलनाच्या आयोजनासाठी गिरिमित्र विभागासोबत सहयोगी संस्था म्हणून  माउंटेनीयर्स  असोसिएशन  डोंबिवली ह्या संस्थेने सहभाग घेतला. त्या संस्थेचे जेष्ठ कार्यकर्तेश्री. सतीश गायकवाड यांनी संमेलन प्रमुखाची जबाबदारी स्वीकारली.

गतवर्षीप्रमाणे ह्याही वर्षी संमेलनामध्ये फिल्म सादरीकरण, छायाचित्र स्पर्धा, ब्लॉग  स्पर्धा, रील बनवणे, अनुभव कथन ह्या स्पर्धांचा समावेश करण्यात आला. या सर्व स्पर्धांसाठी विविध मान्यवरांनी परीक्षण केले व त्यानुसार पारितोषिकेही प्रदान करण्यात आली.

मागील वर्षी उत्तम प्रतिसाद मिळालेली बोल्डरिंगची स्पर्धा ह्याही वर्षी त्याच उत्साहात भरवण्यात आली. सु.ल. गद्रे सभागृहातील मंचावर उभारलेल्या कृत्रिम भिंतीवरील प्रत्यक्ष चढाईचा थरार सर्वांनाच खूप भावला. गतवर्षामध्ये पार पडलेल्या विविध हिमालय व सह्याद्रीतील मोहिमा, रेस्क्यु ऑपरेशन्स, दुर्ग संवर्धन कार्य  ह्यांचा आढावा घेऊन त्या त्या कार्यकर्त्यांचे यथोचित सन्मानही करण्यात आले. गिरीप्रेमी पुणे ह्या संस्थेतर्फे पार पडलेली हिमालातील खडतर व आव्हानात्मक अशा मेरू शिखरास गवसणी घालणाऱ्या मोहिमेचे सादरीकरण करण्यात आले.

जेष्ठ गिर्यारोहकांच्या निवड समितीतर्फे निश्चित केले गेलेले आणि गिरिमित्रसंमेलनाचा मानबिंदू असणारे विविध सन्मानही मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या सन्मानमूर्तींची नावे पुढीलप्रमाणे :-

जीवनगौरव सन्मान : श्री. प्रजापती बोधने
गिरिमित्र गिर्यारोहक : श्री. कैवल्य वर्मा, श्री जितेंद्र गवारे
गिरिमित्र संस्थात्मक कार्य : श्री. सुनील गायकवाड, श्री. सतीश गायकवाड, श्री. श्रीकांत कासट.

गिर्यारोहक क्षेत्रात अनेक संस्था चांगल्या पद्धतीने योगदान देत असतात. अशा काही संस्थांचाही यथोचित सन्मान संमेलनात करण्यात येतो.  अशा  संस्थांची नावे पुढील प्रमाणे :-

गिरिमित्र  संस्था सन्मान : गिरीकूजन पुणे, मैत्रेय प्रतिष्ठन कोल्हापूर.
शरद ओवळेकर सन्मान : गडकरी परिवार, माणगाव

संमेलनातील विशेष अतिथी श्री. प्रवीण भोसले ह्यांनी मुलाखतीद्वारे छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या विशेष मोहिमांवर विस्तृत माहिती देऊन त्यांचे कार्य मौलिक माहितीद्वारे उलगडून दाखवले तर श्री. ख्रिस्तोफ वेलीकी ह्यांनी आयुष्यातील कठीण वेळीही गिर्यारोहणाचा अनुभव कसा उपयोगी पडला हे सांगत त्यांच्या विविध अष्टहजारी मोहिमांचा आढावा घेतला.

सुमारे ५०० ते ५२५ च्या जवळपास  प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि संमेलनासाठी मिळणाऱ्या विविध देणग्या तसेच अनेक गिर्यारोहण साधने व पुस्तके विक्रेत्यांचा पाठिंबा इ. गोष्टींमुळे संमेलन आर्थिक दृष्ट्याही समाधानकारक ठरले. विभागाच्या, माउंटेनीयर्स असोसिएशन डोंबिवली ह्या संस्थेच्या आणि इतरही विविध संस्थांच्या कार्यकर्त्यांनी मिळून मिसळून आपापल्या जबाबदाऱ्या योग्य निभावल्याने संमेलनाचे आयोजन नेहमीप्रमाणेच उत्कृष्टरीत्या पार पाडले.

**किल्ले प्रतिकृती बांधणी स्पर्धा :**

गिरिमित्र विभागातर्फे दिवाळी निमित्ताने किल्ले प्रतिकृती बांधणी स्पर्धा घेण्यात आली. गतवर्षाप्रमाणे ह्याही वर्षीही ही स्पर्धा संपूर्ण महाराष्ट्रभर भौगोलिकरीत्या ४ विभागात म्हणजेच, मुलुंड व भांडूप, ठाणे व नवी मुंबई शहर व इतर उपनगरे आणि उर्वरित महाराष्ट्र, अशा विभागांतर्गत घेण्यात आली. हे चारही विभाग मिळून जवळपास १२८ संघातर्फे एकूण सुमारे १२०० आबालवृध्दांनी ह्या स्पर्धेत सहभाग घेतला. प्रत्येक विभागामध्ये ही स्पर्धा २ गटांमध्ये घेण्यात आली होती, दहावी इयत्ता पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे जुनिअर गट व दहावीच्या पुढील सिनियर किंवा खुला गट.

ह्या एकूण १२८स्पर्धकांच्या प्रतिकृतींचे परीक्षण शक्यतो स्वतः भेट देऊन तसेच अभिनव गुगल ड्राइव्ह वरील फोटो / व्हिडिओ यांच्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले. - मुलुंड व भांडूप -विभागाचे परीक्षण - श्री.धनंजय मदन - (ज्येष्ठ प्रस्तरारोहक व सायकलिस्ट) आणि श्री. राजन बागवे- (अनुभवी वास्तुविशारद व गिर्यारोहक) ह्यांनी केले . ठाणे व नवी-मुंबई विभागाचे परीक्षण श्री. संजय तळेकर- (प्रसिद्ध आर्टिस्ट, किल्ले मॉडेल मेकर व गिर्यारोहक ), डॉ.अमर अडके (इतिहास अभ्यासक व गिर्यारोहक ) आणि - श्री. अतुल गुरु- (महाराष्ट राज्य दुर्ग संवर्धन समिती माजी सदस्य व गिर्यारोहक ) ह्यांनी केले . मुंबई शहर व उपनगर विभागाचे परीक्षण श्री. प्रवीण कदम- (महाराष्ट राज्य दुर्ग संवर्धन समिती माजी सदस्य व इतिहास अभ्यासक ), - श्री. सुरेंद्र कासट- (इतिहास अभ्यासक, लेखक व गिर्यारोहक) आणि श्री. शेखर राजेशिर्के- (प्रसिद्ध छायाचित्रकार, फिल्म मेकर व गिर्यारोहक ) ह्यांनी केले होते. -उर्वरित महाराष्ट्र- विभागाचे परीक्षण श्री. - अमित सामंत- (किल्ले- इतिहास अभ्यासक व गिर्यारोहक ) आणि - श्री. महेंद्र गोवेकर (लेखक - नकाशातून दुर्गभ्रमंती व गिर्यारोहक) ह्यांनी केले. किल्ल्याचे भौगोलिक व ऐतिहासिक महत्त्व कसे समजून घ्यावे तसेच सोप्या पद्धतीने जवळ मिळणाऱ्या साहित्यांच्या आधारे इको फ्रेंडली किल्ला कसा बनवावा, परीक्षण दरम्यान काय बघितले जाणार व मार्क्स कसे देण्यात येणार, इत्यादींवर आधारित किल्ले बांधणी कार्यशाळा सर्व स्पर्धकांसाठी घेण्यात आली होती. ह्या कार्यशाळेत प्रसिद्ध , किल्ले मॉडेल मेकर - श्री. संजय तळेकर ह्यांनी सर्व उपस्थितांना झूम मिटिंग / व्हिडिओ कॉल च्या माध्यमातून मार्गदर्शन केले. ह्या वर्षी अनेक स्पर्धकांनी नेहमीचे किल्ले न घेता काही विशेष अपरिचित किल्ले निवडले होते. अनेकांनी ईंटरनेटच्या माध्यमातून माहिती मिळवून किल्ले बनवले होते. गतवर्षी पेक्षा ह्यावर्षी सादर झालेल्या किल्ल्यांचा दर्जा निश्चितच चांगला व सर्वसमावेशक होता. ह्यामुळे परीक्षकांना अंतिम निकाल तयार करणे आव्हानात्मक होते तरीही त्यांनी अधिक परिश्रम घेऊन योग्य निर्णय करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. विभागवार निर्णय झाल्यानंतर चारही विभागातून मिळून महाराष्ट्रातील 'सर्वोकृष्ट किल्ले प्रतिकृती'हे ही पारितोषिक दोन्ही गटांसाठी निश्चित करण्यात आले. स्पर्धेचे निकाल जाहीर करणे व पारितोषिक वितरण समारंभ, महाराष्ट्र सेवा संघाच्या सु.ल. गद्रे सभागृहात दि. १७ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ७:०० वाजता करण्यात आला. त्या कार्यक्रमास सुमारे ४०० हून अधिक स्पर्धक प्रत्यक्ष तर मुंबई बाहेरील अनेक स्पर्धक ऑनलाइन च्या माध्यमातून हजर होते. ह्या कार्यक्रमात सर्व परीक्षकांचा सन्मान करण्यात आला तसेच सेवा संघाचे पदाधिकारी, काही परीक्षक व विशेष तज्ज्ञांनी, उपस्थित श्रोत्यांस मौलिक मार्गदर्शनही केले. ह्या स्पर्धेसाठी विभागामधून श्री. राहुल मेश्राम ह्यांनी विशेष परिश्रम घेतले. विभागाचे इतर सर्वच कार्यकर्ते, तसेच श्री. मोहित तांडेल, श्री. अभिजीत रणदिवे, श्री. श्रीकर पिसोळकर, श्री. निखिल फडके, सेवा संघाचा कर्मचारी वर्ग ह्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. एकूणच ह्या स्पर्धेस मिळणारा प्रतिसाद, दर वर्षी सादरीकरणांमध्ये होणाऱ्या सुधारणा, सहभागींचा उत्साह पाहता स्पर्धेचा उद्देश निश्चितच सफल होत आहे असा विभागाच्या सर्वच पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना विश्वास वाटतो.

ह्या वर्षात वरील दोन प्रमुख कार्यक्रमांव्यतिरिक्त, अखिल गिर्यारोहण महासंघाच्या, महाराष्ट्रातील १२ किल्ल्यांसाठी युनेस्को मान्यता मिळवण्यासंदर्भात, महाराष्ट्र सरकारच्या मार्गदर्शनानुसार किल्ले प्रतिकृती बनवण्याच्या कार्यातही गिरिमित्र विभागाने महत्त्वपूर्ण सहकार्य केले.

गिरिमित्र विभागातर्फे अनेक उत्तमोत्तम कार्यक्रम यशस्वीरीत्या सादर करण्यात आले. त्या सर्वांच्या व्यवस्थापनामध्ये विभागाचे सदस्य, संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी वर्ग, इतर संस्थांमधील गिरिमित्र व अनेक उत्साही कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले आणि त्यासाठी आम्ही सर्व त्यांचे ऋणी आहोत.

किरण देशमुख - कार्यवाह | हृषिकेश यादव - अध्यक्ष

# अर्थ विभाग



विजय वझे ,(अध्यक्ष) सी.ए.अमिता ठोसर,( कार्यवाह)

सदस्य : प्रकाश सडेकर, तृप्ती राणे, ॲड.श्रेया देशपांडे, अरुण भंडारे, विजय वैद्य, विनय देसाई, विवेक दांडेकर, नितीन ढवळीकर, सी.ए. संजीव गोखले, सुरेंद्र तारे

| अनु. | दिनांक | विषय | वक्ता | पुष्प |
|---|---|---|---|---|
| १ | २१/०४/२०२४ | अर्थव्यवस्था आणि गुंतवणूक परिसंवाद | श्री आशिष वाकणकर<br>श्री निखिल नाईक | १०५ |
| २ | २६/०७/२०२४ | केंद्रीय अर्थसंकल्प २०२४ - अर्थमंत्र्यांच्या पोतडीतून काय मिळणार | श्री मेहरबून इराणी<br>श्री. संजीव गोखले | १०६ |
| ३ | २१/१२/२०२४ | भारतीय शेअरबाजाराची दिशा | श्री. अजय वाळिंबे | १०७ |
| ४ | ०२/०२.२०२५ | केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ - काही वेगळा का नेहमीसारखाच ? | श्री.केदार ओक | १०८ |
| ५ | २२/०२/२०२५ | शेअरमार्केटमध्ये उलथापालथ - पुढची दिशा कुठची ? एक परिसंवाद | श्रीमती स्वाती कुलकर्णी<br>श्री उदय तारदाळकर<br>श्री अशिष वाकणकर<br>श्री निखिल नाईक | १०९ |

अर्थ विभागाचे उपक्रम :

१. ४ जानेवारी २०२५ : विज्ञान विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर गुन्ह्यांचा वाढता धोका आणि बचावाचे उपाय' - एक संवाद हा कार्यक्रम आयोजित केला होता. ह्या विषयातील तज्ज्ञ श्री मकरंद वाघ ह्यांनी अतिशय महत्त्वाचा विषय सोदाहरण प्रभावीपणे मांडला.

२. ८मार्च २०२५ : अर्थ विभागातर्फे 'शेअर मार्केट आणि आयकर' या दोन महत्त्वाच्या आणि संवेदनाशील विषयांवरील कार्यशाळा घेण्यात आली. त्याला अर्थमित्रांचा चांगला प्रतिसाद मिळाला. श्री केदार ओक यांनी शेअर मार्केटवर तर श्री संजीव गोखले यांनी आयकर ह्या विषयावर मार्गदर्शन केले.

सी.ए. अमिता ठोसर, कार्यवाह विजय वझे, अध्यक्ष

# साहित्य सम्राट न.चिं. केळकर ग्रंथालय

अध्यक्ष - नंदिनी हंबर्डे, कार्यवाह - अरुण भंडारे
सभासद - विनोद सौदागर, सदाशिव पोतदार, मेधा देव, अनंत जोशी, अर्चना कामत, पूनम भाटे

या आर्थिक वर्षात ग्रंथालय समितीचे सभासद संस्थेचे माजी अध्यक्ष दृष्टीसेवा विभागाचे अध्यक्ष अशी पदे भूषविलेल्या विनोद सौदागर यांचे अल्पशा आजाराने आकस्मित निधन झाले. ग्रंथालयाच्या आतापर्यंतच्या वाटचालीत त्यांचा मोलाचा सहभाग होता. त्यांच्या स्मृतीला अभिवादन करुन या आर्थिक वर्षातील कार्यक्रमाची माहिती देतो.

सोमवार दि. ३ जून २०२४ - तुम्हीच व्हा तुमच्या आरोग्याचे शिल्पकार या विषयावर श्री.प्रशांत कऱ्हाडे (माय हेल्थ माय रिसपॉन्सिबिलीटी या पुस्तकाचे लेखक) यांनी श्रोत्यांना मार्गदर्शन केले. अनेक छोटया छोटया टिप्स त्यांनी दिल्या.

गुरुवार दि. २० जून २०२४ - छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक दिनानिमित्त ग्रंथालयाने विशेष व्याख्यानाचे आयोजन केले.विषय होता छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा. ग्रंथालयाचे कार्यवाह अरूण भंडारे हे या कार्यक्रमाचे ववते होते. मागिल वर्षीच त्यांचे लेखसंग्रह, छत्रपती शिवाजी महाराज आणि इतर लेख पुस्तक प्रकाशित झाले होते. राज्याभिषेकाचे महत्व तसेच राज्याभिषेक सोहळा या विषयी त्यांनी माहिती दिली.

शुक्रवार दि. २७ सप्टेंबर २०२४ - कै. लक्ष्मणराव महाबळ पितृस्मृती व्याख्यानमालेचे आयोजन २७ व २८सप्टेंबर या दिवशी केले होते. शुक्रवार दि.२७ सप्टेंबर २०२४ रोजी श्री.दिलीप जोशी (लेखक,पत्रकार, व्याख्याते) यांनी भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, यांच्या क्रांतीकार्याची तसेच त्यांच्या हौतात्म्याची माहिती दिली.

शनिवार दि. २८सप्टेंबर २०२४ - मेजर मनीषा नाईक (निवृत्त) यांनी कारगील युध्दात आपल्या प्राणाचे बलिदान करुन भारताला विजयश्री मिळवून देणाऱ्या ज्ञात-अज्ञात वीरांच्या शौर्यगाथा श्रोत्यांसमोर मांडल्या. त्यांच्या भाषणाला, निवेदनाला जोड होती ती स्लाईडची. श्रोत्यांचा चांगला प्रतिसाद व्याख्यानांना होता.

शुक्रवार दि.११ ऑक्टोबर २०२४ - ग्रंथालयात प्रतिवर्षीप्रमाणे सरस्वती पूजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाला संस्थेचे व ग्रंथालयाचे सदस्य तसेच दृष्टीसेवेचे विद्यार्थी उपस्थित होते.

सोमवार दि. १४. ऑक्टोबर२०२४ :- सेतुमाधवराव पगडी स्मृती व्याख्यानासाठी यावर्षी प्रवीण कदम यांना आपण वक्ते म्हणून आमंत्रित केले होते. त्यांचा विषय होता विस्मृतीत गेलेले रस्ते , वास्तू आणि व्यक्ती. मुंबई महानगरातील जुने रस्ते, ज्यांची नावे या रस्त्यांना, वास्तूंना दिली आहेत त्या व्यक्ती यांचा परिचय तसेच इतिहास प्रवीण कदम यांनी दृकश्राव्य माध्यमातून कथन केला. प्रवीण कदम हे महाराष्ट्र टाइम्सचे स्तंभलेखक म.टा. मध्ये एका सदरात त्यांनी अनेक रस्त्यांचा इतिहास उलगडून दाखवला होता.

सोमवार दि. २१ ऑक्टोबर २०२४ :- भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस यावर्षी विशेष वाचक संवाद मध्ये साजरा करण्यात आला. डॉ. कलामांच्या साहित्यकृतीवर यामध्ये चर्चा झाली. डॉ. कलामांचे सर्व साहित्य सभासदांसाठी ग्रंथालयाच्या दर्शनी भागात ठेवले होते.

मंगळवार दि. २६ नोव्हेंबर २०२४ :- भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४/२०२५ या अमृतमहोत्सवी वर्षात संविधान अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. भारताच्या संविधानाचे तत्व, मूल्य, आदर्श व संविधान निर्मितीचा उद्देश स्पष्ट करण्याकरिता संविधान प्रास्ताविक / उद्देशिकेचे ग्रंथालयाच्या वाचक संवाद उपक्रमात सामूहिक वाचन करण्यात आले.

शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी २०२५ :- जेष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दि. २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येतो.ग्रंथालयाने या दिवसाचे औचित्य साधून शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी २०२५ रोजी ग्रंथालयाचे लिहू आनंदे नावाचे अनियतकालिकाईचे प्रकाशन केले. ग्रंथालयातील सभासदांना लिहिते करण्यासाठी ग्रंथालयाने वाचकांसाठी एक संधी उपलब्ध करून दिली. . ग्रंथालयाने केलेल्या आवाहनाला सभासदांनी उत्तम उत्स्फूत प्रतिसाद दिला. या अंकात सतीश पाटणकर, माधुरी पाटणकर, नंदिनी हंबर्डे, अरुण भंडारे, अनंत जोशी, सचिन वाडेकर, चंद्रकांत दढेकर, रेखा देशपांडे, राजन कासले, मीनाक्षी गोखले यांच्या लेखांचा समावेश आहे.

शनिवार दि. २२ मार्च २०२५ :- साहित्य साधना पुरस्काराचे हे १९ वे वर्ष. ग्रंथालयाने यावर्षी समीक्षा हा साहित्य प्रकार पुरस्कारासाठी निवडला होता. ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या समीक्षेवरील पाच पुस्तकातून परीक्षक डॉ.भारती निरगुडकर यांनी 'नव्या वाटा शोधणारे कवी' या समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांच्या ग्रंथाची निवड केली. भक्ती चपळगावकर यांनी डॉ. रसाळांची मुलाखत घेतली.

महाराष्ट्र सेवा संघाचा मैत्रेयी हा महिला विभाग आणि सा.स.न.चिं. केळकर ग्रंथालय यांनी संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'मला काय वाटतं' लेखन स्पर्धेला यंदाही उत्तम प्रतिसाद मिळाला. एकूण १४ स्पर्धकांनी या स्पर्धेत भाग घेऊन विविध विषयांवरील आपली मते व्यक्त केली. स्पर्धेचे परिक्षक म्हणून श्रीमती माधुरी ताम्हाणे आणि श्रीमती अस्मिता मोहिते यांनी काम पाहिले. सर्व स्पर्धकांपैकी ५ स्पर्धकांची विजेते म्हणून निवड करण्यात आली, तर ३ स्पर्धकांची उल्लेखनीय स्पर्धक म्हणून निवड केली.

**विजेते** : सुनील कुलकर्णी (बेरोजगारीचे काय करायचे?), गार्गी वैशंपायन (आधुनिक भारताच्या जडणघडणीत समाजमाध्यमांचे योगदान), अनिल कदम (लग्नसंस्थेचे भवितव्य), मनोज मेहता (माझी सोलो ट्रीप),सुचेता आचार्य (लग्नसंस्थेचे भवितव्य)

**उल्लेखनीय विजेते** : सागर साबडे (द.मा. मिरासदारांचा विनोद), अलका जोशी (लग्नसंस्थेचे भवितव्य), हर्षद आचार्य (तंत्रज्ञान / कृत्रिम बुद्धिमत्तेने भ्रष्टाचारावर उपाय सापडेल काय?)

संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य, तसेच इतर विभागातील ज्या सदस्यांनी, ग्रंथालयाचे सदस्यत्व घेतले नसेल, त्यांनी सदस्यत्व घेऊन वाचन संस्कृतीच्या अभिवृद्धीसाठी साहाय्य करावे असे नम्र आवाहन करतो.

पुढील आर्थिक वर्षात देखील उत्तमोत्तम पुस्तके वाचकांना उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देतो.

!! वाचू आनंदे !!

अरुण भंडारे -कार्यवाह

नंदिनी हंबर्डे - अध्यक्ष

| **वर्षातील नवीन ग्रंथ खरेदी** | **वर्षात देणगी दाखल मिळालेले ग्रंथ** | **एकूण** |
|---|---|---|
| २५७ | २५७ | ५१४ |

३१-३-२०२५ रोजी उपलब्ध ग्रंथ - ३८८३८

अहवाल वर्षात ७७,५३८ /- रुपये किमतीची ग्रंथखरेदी करण्यात आली.

**ग्रंथालय सभासद तपशील**

**३१-३-२०२५ अखेर सभासद**

| विशेष सभासद | बाल विभाग | ग्रंथ विभाग | ग्रंथ विभाग-सिटी ऑफ जॉय | |
|---|---|---|---|---|
| १४७ | ११८ | ५९८ | ३७ | |
| अंक विभाग | ज्येष्ठ नागरिक मंच | सिटी ऑफ जॉय -बाल | ग्रंथ अधिक मासिक | एकूण सदस्य |
| ११९ | ७ | ३ | ३५ | **१०६४** |

**ग्रंथालयात दरमहा येणाऱ्या अंक, मासिके व साप्ताहिके यांचा तपशील**

| **प्रकार** | **मासिके** | **त्रैमासिके** | **पाक्षिके** | **साप्ताहिके** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| मराठी | २० | ७ | - | ४ | ३१ |
| हिंदी | ६ | - | - | - | ६ |
| इंग्रजी | ७ | - | ९ | ५ | २१ |
| एकूण | ३३ | ७ | ९ | ९ | ५८ |

**दिवाळी अंक योजना २०२४-२०२५**

| | |
|---|---|
| सभासद संख्या | १०१ |
| अंकाचे प्रकार | ७२ |
| अंकांच्या एकूण प्रती | १४३ |
| खरेदी किंमत रुपये | ३१,०७०/- |

**मोफत वाचनालय - वाचनालयासाठी घेण्यात येणारी वृत्तपत्रे**

| प्रकार | संख्या | नाव |
|---|---|---|
| मराठी | १२ | महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, लोकमत, सामना,पुढारी, प्रहार, नवाकाळ, सकाळ, मुंबई तरुण भारत, रत्नागिरी टाईम्स, पुण्यनगरी |
| इंग्रजी | ४ | टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, इकॉनॉमिक टाईम्स, हिंदुस्तान टाईम्स |

## **विज्ञान विभाग** (विज्ञान प्रेमींचा मंच)



**विज्ञान**

अध्यक्ष : सतीश पाटणकर, कार्यवाह : गुरूप्रसाद कार्लेकर,
विशेष सहभाग : विद्याधर जोशी
तरूण सदस्य : वैभव बुद्धदेव, अथर्व जोशी, जयश्री सोनावणे, वरदा नवाथे, मृणाल थोरात, चिन्मयी वझे, जाई कुलकर्णी, सचिन वझे, अर्चित गोखले, अनिरुद्ध शेवळे, आदित पाटणकर

इस्त्रोच्या कारकिर्दीबद्दल एका ज्येष्ठ विज्ञान पत्रकाराकडून समजून घेवून चंद्रयान ३ चा यशस्वी पल्ला आपण २०२३ रोजी गेल्या वर्षी साजरा केला. ह्या कार्यक्रमाला विद्यार्थी व नागरिकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. पुढे ह्याच यशानिमित्त आपल्या पंतप्रधान महोदयांनी २३ ऑगस्ट हा आपला राष्ट्रीय ''अंतराळ दिन'' म्हणूण जाहिर केला. आणि असा पहिला वहिला दिन आपण २४ ऑगस्ट २०२४ ह्या दिवशी साजरा केला.

शनिवार, दि २४ ऑगस्ट २०२४ रोजी पहिल्या ''राष्ट्रीय अंतराळ दिना''निमित्त अवकाश मोहिमांचा आपल्या दैनंदिन जीवनावर कसा प्रभाव पडतो आणि त्याचा आपल्याला कसा फायदा होतो हे जाणून घेण्यासाठी - महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंडच्या विज्ञान विभागातर्फे महाराष्ट टाइम्सच्या सहकार्याने आयोजित केलेला ''भारताची उत्तुंग अंतराळ झेप'' हा कार्यक्रम संस्थेच्या सु. ल. गद्रे सभागृहात संपन्न झाला. इस्त्रोच्या महत्वाच्या प्रकल्पाचा अनुभव असलेल्या आणि ऍस्ट्रोसॅट मोहिमेमध्ये योगदान असणाऱ्या खगोल शास्त्रज्ञ डॉ.विनिता नवलकर यांनी या विषयावर अतिशय रंजकपणे श्रोत्यांना प्रबोधित केले आणि श्रोत्यांच्या सगळ्या प्रश्नांची मनसोक्त उत्तरे दिली.
दरवर्षीप्रमाणे ह्याही वर्षी कार्यक्रमाला तुडुंब प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांपासून जेष्ठांपर्यंत सगळ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर वझे, उपाध्यक्ष श्री. सतीश पाटणकर आणि कार्यवाहक श्री. जयप्रकाश बर्वे उपस्थित होते. त्याच बरोबर महाराष्ट टाइम्सचे निवासी संस्थापक श्री. समीर कर्वे देखील उपस्थित होते.

शनिवार, दि. ४ जानेवारी २०२५ रोजी, विज्ञान विभाग आणि अर्थ विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेला "सायबर गुन्ह्यांचा वाढता धोका आणि बचावाचे उपाय – एक संवाद!!!!" हा कार्यक्रम संस्थेच्या सु. ल. गद्रे सभागृहात संपन्न झाला. ख्यातनाम सायबर तज्ज्ञ डॉ.मकरंद वाघ या कार्यक्रमाचे वक्ते होते.
डॉ. वाघ यांनी शेअर मार्केट घोटाळे, केवायसी घोटाळे, यांच्या बरोबरीने अनेक प्रकारचे सायबर घोटाळे कसे वाढत आहेत, डिजिटल अरेस्ट सारख्या घोटाळ्यांची कार्यपद्धती कशी असते, तंत्रज्ञानाचा उपयोग करून आणि बहुजनांना त्याची पुरेशी समज नसल्याचा गैरफायदा घेऊन हे घोटाळे कसे केले जातात, त्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी सामान्य माणसाने कुठल्या गोष्टींची आणि कशी काळजी घेतली पाहिजे यावर अतिशय माहितीपूर्ण सादरीकरण केले. उपस्थितांच्या सर्व प्रकारच्या शंकांचे त्यांनी अतिशय सोप्या पद्धतीने निराकरण केले. अशाप्रकारे डिजिटल जीवनाला सुरक्षित बनवण्यासाठी सायबर धोके आणि घ्यावयाची काळजी या विषयावरील हा एक सर्व समावेशक संवाद असलेला कार्यक्रम उत्तम रीतीने पार पडला.

गुरुप्रसाद कार्लेकर – कार्यवाह　　　　　　　　सतीश पाटणकर , अध्यक्ष

# दृष्टिसेवा अभ्यासिका

अध्यक्ष - विनोद सौदागर , कार्यवाह - नंदिनी हंबर्डे , सुनीता देवधर - सल्लागार
सभासद - दत्तात्रय कुलकर्णी, रश्मी अनगळ, सदाशिव पोतदार, अनुपमा देशपांडे, मीना वीरकर

मार्च - एप्रिल २०२३ -२०२४ मध्ये शालांत परीक्षेला ९ विद्यार्थी बसले होते व ते सर्वच्या सर्व यशस्वी झाले. दृष्टिसेवेचा निकाल १०० टक्के लागला .

१) सिया शुक्ल - ८८.६०
२) नितेश गायकवाड - ८५.००
३) शालीनी राठोड - ६१.४०
४) शुभम पालकर - ७४.४०
५) गुरूनाथ भोईर - ७८.६०
६) शुभंकर परब - ६९.४०
७) नयान शेख - ६३.६०
८) हजमा खान -६९.४०
९) स्वरूप कोळी - ७४.८०

यशस्वी मुलांचा कौतूक सोहळा दि. १५ जून २०२४ रोजी, संस्थेच्या सु. ल. गद्रे सभागृहात संपन्न झाला. स्नेहांकित हेल्पलाइनच्या संस्थापिका, अध्यक्षा परिमलाताई भट प्रमुख पाहुण्या होत्या. त्यांच्या हस्ते मुलांना सॅक बॅग भेट म्हणून देण्यात आल्या. या सर्व बॅग्स भाग्यक्षी हेरवाडकर यांनी स्पॉन्सर केल्या होत्या.

दरवर्षीप्रमाणे मुलुंड विद्यामंदिर शाळेचे ९ विद्यार्थी लेखनिक म्हणून होते. त्यांनी लेखनिक म्हणून उत्तम काम केले. त्यांना सन्मानपत्र आणि मानधन पारितोषिक देण्यात आले.

श्री. अजय वाळिंबे यांच्या देणगीतून मराठी विषयांत सर्वाधिक गुण मिळालेल्या नितेश गायकवाड ( ८२ गुण ) त्याला "सरला वाळिंबे स्मृतीप्रित्यर्थ" विशेष पारितोषिक, व गणितात सर्वाधिक गुण मिळाले म्हणून नितेश गायकवाड ( ९६ गुण ) त्याला "नलिनी नारगोलकर स्मृतीप्रित्यर्थ" विशेष पारितोषिक देण्यात आले.

दृष्टिसेवेच्या मुलांसाठी यावर्षी अनेकविध कार्यक्रमांचे आयोजन विभागाने केले होते. ब्रेल जयंतीच्या दिवशी लुई ब्रेल बद्दल माहिती मुलांना दिली. गणेशोत्सवात मुलांना सार्वजनिक गणेशोत्सव सजावट अनुभवायला नेले होते. २६ ऑक्टोबरला दिवाळीच्या विशेष पार्टीत मुलांनी सुंदर आकाश कंदील आणि सुंदर रंगांनी सुबक अशा पणत्या सजवल्या. अशाप्रकारे सर्व कार्यक्रमाचा आनंद मुलांनी लुटला.

१९ नोव्हेंबर २०२४ रोजी दृष्टिसेवा अध्यक्ष विनोद सौदागर यांचे आकस्मिक निधन झाले. अतिशय दु:खदायक घटना आहे ही. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

मार्च २०२४ - २०२५ मध्ये शालांत परीक्षेला दृष्टीसेवेर्तफे ७ विद्यार्थी बसले होते. ते सर्वच्या सर्व विद्यार्थी यशस्वी झाले. दृष्टीसेवेचा निकाल १०० टक्के लागला, तो पुढील प्रमाणे :-

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|
| १ | निकिता भालेराव | ७८.६० |
| २ | अथर्व जाधव | ७३.२० |
| ३ | प्रज्ञावती नवघरे | ७२.२० |
| ४ | सुदर्शन चव्हाण | ७२.०० |
| ५ | जगधीश जाधव | ७०.२० |
| ६ | निलेश लाखे | ६९.४० |
| ७ | कमलेश चव्हाण | ६६.४० |

श्री. अजय वाळिंबे यांच्या देणगीतून मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळालेल्या निकिता भालेराव (मराठी - ८०) (सरला वाळिंबे स्मृतीप्रित्यर्थ विशेष पारितोषिक) रु. १५००/- (व गणित विषयात सर्वाधिक गुण मिळाले म्हणून निकिता भालेराव- गणित -८७ ( हिला नलिनी नारगोलकर स्मृतीप्रित्यर्थ) रु. १५००/- रोख विशेष
पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.
धन्यवाद !

नंदिनी हंबर्डे ,कार्यवाह सुनिता देवधर ,सल्लागार

## ऐरोली शाखा

अध्यक्ष - प्रदीप र. सप्रे , कार्यवाह - मनोहर कोशे , कोषाध्यक्ष - किशोर म. पेंढरकर, सहकार्यवाह -नवीन कुलकर्णी
**सदस्य :** चंद्रशेखर वझे (पदसिद्ध), जयप्रकाश बर्वे (पदसिद्ध) , शंकर गो. वीरकर, विजय जगताप, आरती सप्रे, माधवी देशमुख, दक्षता झगडे, अनिल कुऱ्हेकर, पंकज पाठक.

नमस्कार!
ऐरोली शाखेत या वर्ष आपण शाखेच्या आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी काही उपाय केले. त्यांत पहिला उपाय म्हणजे संस्थेच्या गच्चीवरील ४० कि.वॅ. चा सौर ऊर्जा प्रकल्प. हा सौर ऊर्जा प्रकल्प ग्रीन लान्स (जे टाटा सोलरचे वितरक आहेत.) त्यांच्या साह्याने बसवला आहे. आत्ता व भविष्यातही महावितरणचे चढे युनिट रेट पाहून आपण हा निर्णय घेतला. या मुळे वीज बिलात बऱ्यापैकी बचत होऊ शकेल. दुसरा उपाय म्हणजे आपल्या दुसऱ्या मजल्यावरील अभ्यासिका, ज्या अभ्यासिकेला विद्यार्थांचा प्रतिसाद ऐरोलीत अनेक नवीन अभ्यासिका उघडल्यामुळे कमी झाला आहे, ती आपण आपल्या सभागृह क्र.२ मध्ये हलवली व दुसरा मजला सामाजिक उपक्रमातर्गत अत्याधुनिक व्यायाम शाळा/किक बॉक्सिंग क्षेत्रात सभागृह क्र.२ मध्ये कार्यरत असलेल्या 'अल्फा कॉम्बॅट' यांना २ऱ्या मजल्यावर हलवले. यामुळे संस्थेला मिळणाऱ्या उत्पन्नात सकारात्मक फरक पडला. सौर ऊर्जा तसेच दुसऱ्या मजल्याच्या करारांच्या प्रक्रियेत ऐरोली नवनिर्माण समितीच्या सदस्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. सध्याच्या परिस्थितीत, जेव्हा शुभकार्यांची नोंदणी कमी झाली आहे व आपले केटरिंग व डेकोरेटर्स चे कंत्राटदार श्री नाटेकर यांनी सतत मागणी केली होती की सद्य स्थितीतल्या करारात सुधारणा करायला हवी. तेव्हा या प्रश्नाचा साधकबाधक विचार करून नवीन करार करण्यात आला.
वर्धापन दिन : १३ एप्रिल २०२४ रोजी शाखेच्या वर्धापन दिना निमित्त 'गीत रामायण' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. कार्यक्रम श्री अमित नेसरीकर यांनी सादर केला तर सूत्रसंचालन संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर वझे यांनी केले. हा कार्यक्रम अतिशय उत्तम झाला.
ग्राहक पेठ : २७, २८ व २९ सप्टेंबर २०२४ या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ग्राहक पेठेस ग्राहकांनी उत्साहाने प्रतिसाद देऊन हा कार्यक्रम सफल केला. या कार्यक्रमात ३९ स्टॉल धारकांनी भाग घेतला. संस्थेला घसघशीत उत्पन्न मिळाले. या पेठेच्या अयोजनात व नियोजनात श्रीमती आरती सप्रे, नवीन कुलकर्णी तसेच इतरही सदस्यांनी भरपूर मेहनत घेली.
